REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास,
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १० मे, १९४४ अंक १९

## प्रगतीचें श्रेय आपणांकडे

### सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| आलेलें काम | रु. २१, ४४, ४७१ | १९४२ | ५ लक्ष ३ हजारानें |
| मंजूर काम | रु. १८, ३५, ७१४ | पेक्षां | २ लक्ष ९० हजारानें |
| पूर्ण विमा काम | रु. १६, १९, ७७५ | वाढ | ४ लक्ष ७ हजारानें |

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, भागीदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याच्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. विमा—योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.

नासिक } मॅनेजिंग डायरेक्टर

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२३,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

पुण्यांतील

## आदर्श निवासस्थान व भोजनालय

## छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस

बुधवार चौक, पुणें २.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट.

जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.

नागपूर शाखा : मोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. १०,००,००० | रु. ५,००,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४½% दरमाहा डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमिअमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले.

विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

डी. व्ही. गोखले,
B. Com., C. A. I. B., C. A. I. I. B.
मॅनेजर

## WE ARE THE TRUSTEES OF YOUR SAVINGS

We are the experts who handle your investments, so that you may receive the maximum return on your money painfully saved.

You can command our services in this by taking out a Life Insurance Policy.

**THE SUPREME MUTUAL ASSURANCE COMPANY LIMITED, POONA.**

Assures its Policy Holders of maximum returns on their investments.

Economic Management. Sound organisation are the unique features of this LEADING MUTUAL LIFE OFFICE IN WESTERN INDIA.

For appointment as Inspector of Agencies on monthly salary, write to :—

HEAD OFFICE :— 7 Nagesh Peth, POONA CITY.

V. N. Mysore, M. A., LL. B. *Manager.*


## विविध माहिती

### हिंदी कापडाचें उत्पादन

जानेवारी, १९४४ मध्यें डिसेंबर १९४३ व जानेवारी १९४३ ह्या महिन्यांचे मानानें हिंदी गिरण्यांत कपाशीचा उठाव कमी झाला, त्याचा परिणाम अर्थातच त्यांचे उत्पादनावर झाला.

### मुंबई प्रांतांतील औद्योगिक वांधे

जानेवारी १९४४ मधील मुंबई प्रांतांतील १८ औद्योगिक वांध्यांत एकूण १०,४८४ कामगारांचे कामाचे २८,६६१ दिवस बुडाले. १८ पैकीं ११ वांधे मुंबईमधीलच होते.

### बॉंबे टॉकीज, लि.

वरील कंपनीस ३१ ऑक्टोबर, १९४३ अखेरच्या वर्षी करासाठीं ७,७३,२४५ रुपये बाजूस काढून १,५८,४७३ रुपये नफा झाला. ऑर्डिनरी भागीदारांस ७% करमाफ डिव्हिडंड मिळालें.

### मुंबईमधील बँका ता. १ जुलै रोजीं बंद

मुंबईतील बँकांना आपले सहामाही हिशेब पुरे करण्यास अवधि मिळावा, ह्यासाठी १ जुलै १९४४ रोजीं त्यांना सुटी देण्यांत आल्याचें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

### बँक ऑफ ग्वेल्हेर लि.

वरील बँकेच्या मुंबई शाखेचा उद्‌घाटन समारंभ ता. ३ मे रोजीं सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांचे हस्तें झाला.

### गेल्या तीन महिन्यांतील हिंदी चलनी नोटांत वाढ

| १९४४ | चलनी नोटांत वाढ |
|---|---|
| जानेवारी | १२·८८ कोटि रु. |
| फेब्रुवारी | १३·८२ ,, रु. |
| मार्च | १४·९१ ,, रु. |

३१ मार्च, १९४३ अखेर संपलेल्या बारा महिन्यांत चलन-विस्तार २९२ कोटि रुपयांचा झाला. त्यापूर्वीच्या बारा महिन्यांतील विस्तार ३०८ कोटि रुपयांचा होता.

### चीनकडे जाणारें टपाल

हिंदुस्थानांतून चीनकडे सुरक्षीच्या मार्गानें जाणारें टपाल डिसेंबर, १९४२ पासून इराण व रशिया ह्यांचे द्वारा जात असे. आतां नव्या जवळच्या रस्त्यानें तें जाऊं लागेल व टपाल २ महिन्यांत चीनला पोंचण्याची व्यवस्था होईल.

### रासायनिक खतांचें उत्पादन

हिंदुस्थानांत रासायनिक खतांचें उत्पादन सुरू करण्यासाठीं यंत्रसामुग्री, कारखान्यांची जागा, इत्यादिसंबंधांत सरकारास सल्ला देण्याकरितां ब्रिटिश तज्ञांना हिंदुस्थानांत बोलावण्यांत येणार आहे.

### मालमत्तेच्या नाशाची खबर द्या

मुंबई शहरांतील ज्यांच्या इमारती पाडून टाकण्यांत आल्या असतील, अशांनीं म्युनिसिपल कमिशनरकडे खबर द्यावी; नाहीं तर त्यांच्या मालमत्तेवरील कर चालूच राहील अशी सूचना देण्यांत आली आहे.

### जाहिरातींवरील खर्च

ग्रेटब्रिटनमधील वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या वेगवेगळ्या धंद्यांच्या जाहिरातींची तुलना केली, तर १९३८ चे मानानें १९४३ सालीं जाहिरातींवरील खर्च निम्म्यावर आल्याचें आढळलें. बुटांच्या धंद्यानें जाहिरातींचा खर्च वाढविला आहे, तर सिगारेट्सच्या जाहिराती १३% इतक्याच राहिल्या आहेत. जादा नफ्यावरील कर भरण्यापेक्षां जाहिरातींवरील खर्च वाढविण्याचें धोरण कांहीं कंपन्यांनीं स्वीकारल्याचें दिसतें.

### खेडेगांवी लोकांना पाणीपुरवठा

ग्रेट ब्रिटनमधील खेडेगांवीं जनतेपैकीं सहा सप्तमांश लोकांना नळाचें पाणी उपलब्ध आहे.

### बँका व कर्जांची मुदत

बँकांनीं व्यापाऱ्यांना व दुकानदारांना द्यावयाचीं कर्जे स्वल्प मुदतीचीं असावीं, असा बँकिंगच्या धंद्याचा प्रघात आहे. सध्यांच्या युद्धजन्य परिस्थितीमुळें कित्येकांचे धंदे बसले आहेत, ते पुनः भक्कम पायावर उभे करण्यासाठीं अशी कर्जे उपयोगीं पडणार नाहींत; दीर्घ मुदतीचीं कर्जे देण्याचें धोरण बँकांनीं पत्करणें आवश्यक आहे, असें लॉर्ड वार्डिंग्टन हे आपल्या लंडन येथील भाषणांत नुकतेच म्हणाले.

### खेडेगांवांच्या तोंडाचे रस्ते

खेडेगांवांच्या तोंडाचे रस्ते करण्यासाठी मुंबई सरकारनें चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांतून खालीलप्रमाणें भागवार पैशाची वाटणी केली आहे:—

| | रुपये |
|---|---|
| मध्य भाग | १,५८,००० |
| दक्षिण भाग | ९८,००० |
| उत्तर भाग | ९४,००० |
| एकूण | ३,५०,००० |

### ग्रेटब्रिटनमधील प्रमुख बँका

(१) मिडलंड, (२) बार्कलेज्, (३) लॉइड्स, (४) वेस्टमिन्स्टर, (५) नॅ. प्रॉव्हिन्शिअल, (६) मार्टिन्स व (७) डिस्ट्रिक्ट ह्या ग्रेट ब्रिटनमधील पहिल्या प्रतीच्या सात बँका आहेत. त्यांपैकीं शेवटच्या दोन मोठ्या असल्या तरी इतर पांचांचे मानानें त्या लहानच आहेत. मिडलंड, बार्कलेज व लॉइड्स ह्या जवळजवळ सारख्याच आकाराच्या आहेत व शेवटच्या दोन्ही बँका मिळून सुद्धां ह्या तीन्हींपैकीं कोणत्याच बँकेच्या निम्मासुद्धां आकाराच्या भरत नाहींत.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १४६ |
| २ प्रमुख राष्ट्रें कोणतीं ! | १४७ |
| ३ "सभांचा कायदा व ... कार्यपद्धति" ... | १४८ |
| ४ बीव हल्यांचे बळी ... | १४८ |
| ५ नागपूर हायकोर्टाचा निर्णय | १४८ |
| ६ स्फुट विचार ... शास्त्रीय संशोधन आणि प्रो. हिल-आर्थिक संवर्धनाच्या योजनेचें रहस्य-साम्राज्य मुख्य प्रधानांची परिषद्-सरकारी रोख्यासंबंधीच्या कायद्यांत सुधारणा-श्री. प्राणलाल ह्यांच्या सूचना | १४९ |
| ७ शेअर बाजार ... | १५० |
| ८ पोस्ट खात्याचें वाढतें काम | १५१ |
| ९ फेडरल कोर्ट ... | १५१ |



# अर्थ

बुधवार, ता. १० मे, १९४४


## प्रमुख राष्ट्रें कोणतीं ?

चालू युद्धांत प्रामुख्यानें पुढें आलेलीं महत्त्वाची राष्ट्रें कोणतीं हें सांगतां आलें तरी "प्रमुख" ह्या विशेषणास पात्र होण्याच्या अटी कोणत्या, हें स्पष्टपणें सांगणें कठीण आहे. प्रमुख राष्ट्रेंच युद्ध तडीपर्यंत चालवूं शकतात व शांततेच्या काळांत निर्णायक राजकीय गोष्टी ठरवितात. तात्विक दृष्टया प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र आहे. परंतु प्रमुख राष्ट्रें इतर राष्ट्रांवर वजन पाडूं शकतात.

केवळ लोकसंख्येचा विचार करून राष्ट्रांचें तुलनात्मक महत्त्व ठरविणें चुकीचें ठरेल. जगाच्या एकूण लोकसंख्येचे पांच साधारण सारखे भाग केले, तर त्याची वाटणी खालीलप्रमाणें होईल:—

| | लोकसंख्या ( कोटि ) |
|---|---|
| ( अ ) प्रमुख तीन राष्ट्रें ( रशिया, अमेरिका, ग्रेटब्रिटन व त्याच्या वसाहती ) | ३९·० |
| ( ब ) चीन | ४६·० |
| ( क ) युरोप | ३६·० |
| ( ड ) हिंदुस्थान व ब्रह्मदेश | ४०·४ |
| ( इ ) उरलेलें जग | ५८·६ |

वरील आकड्यांवरून दिसून येईल कीं, केवळ लोकसंख्येवर राष्ट्रांची मातब्बरी अवलंबून असती तर चीन व हिंदुस्थान ह्यांकडे आज जगाचें नेतृत्व आलें असतें ! देशांच्या क्षेत्रफळावरहि त्यांचें महत्त्व अवलंबून नाहीं. आर्थिक उत्पादन व व्यापार ह्यांवर मात्र देशाचें महत्त्व बऱ्याच अंशीं अवलंबून असतें. केवळ आर्थिक संपत्तीवरूनहि राष्ट्रांच्या शक्तीची कल्पना करतां येणार नाहीं. जनतेच्या किमान गरजा भागवून झाल्यानंतर किती आर्थिक संपत्ति शिलक राहून बल प्रभावी करण्यास उपयोगी पडते, ही गोष्ट महत्त्वाची आहे. हिंदुस्थानाचें राष्ट्रीय उत्पन्न जनतेच्या गरजा भागविल्यानंतर फारसें शिलक उरत नाहीं, हें प्रसिद्धच आहे. म्हणजे लोकसंख्या व विस्तार ह्यांचे दृष्टीनें हिंदुस्थानाचा दर्जा मोठा असला तरी प्रभावी सामर्थ्य त्याचेजवळ नाहीं. खालील तक्ता पहा:—

### जागतिक संपत्ति

| | प्रमुख तीन राष्ट्रें | चीन | युरोप | हिंदुस्थान व ब्रह्मदेश | इतर जग | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| कोळसा (कोटि टन, १९३७) | ८५·९ | ३·७ | ३८·५ | २·५ | ६·२ | १३६·८ |
| पोलाद („ „ १९३७) | ८·५ | ·०४ | ४·२६ | ·१० | ·६ | १३·५ |
| लोखंड („ „ १९३७) | ५·७ | ·०२ | २·९ | ·१९ | ·७ | ९·६ |
| पेट्रोल („ „ १९३९) | २० | ... | ·८ | ·१४ | ७·४ | २८·५ |
| आयात–निर्गत (कोटि डॉलर, १९३८) | ९६९ | ५५ | १०१९ | ९२ | ५८६ | २७२१ |
| दर माणशीं व्यापार (डॉलर, १९३८) | २४ | १½ | ३० | २½ | १० | १२½ |
| आगबोटी (हजार टन, १९३९-४०) | ३२,५०४ | २५८ | २६,३६३ | २३८ | ८,९३४ | ६८,२९७ |
| सोन्याचें उत्पादन (हजार किलो १९३८) | ८५५ | ... | १९ | १० | २६४ | १,१४८ |

राष्ट्राचें भौगोलिक स्थानहि त्याचें महत्त्व ठरविण्यास कारणीभूत होत असतें. ज्या राष्ट्रांच्या सरहद्दींस स्वाभाविक संरक्षण मिळतें, ज्यांना शक्ति एकवटण्यासाठीं वहातुकीच्या साधनांवर ताण टाकावा लागत नाहीं, अशीं राष्ट्रें इतरांपेक्षा जास्त सामर्थ्यवान ठरतात; आपल्या स्वतःच्या प्रभुत्वाखालील संपत्ती ज्यास एकवटतां येऊन लढाई करतां येते, तें राष्ट्र बलवान ठरतें. ह्या दृष्टीनें अमेरिका, रशिया व जर्मनी ह्यांचा अनुक्रम सर्वांत वरती लागतो. ग्रेटब्रिटनचें सामर्थ्य ब्रिटिश साम्राज्याच्या एकीवर व अमेरिकेच्या मैत्रीवर अवलंबून आहे. जपान हें राष्ट्र आज सामर्थ्यवान झालें आहे, परंतु जर्मनीचा पराभव झाला तरी जर्मन राष्ट्र थोड्याच अवधींत पुनः प्रभावी होऊं शकेल तशी जपानची भौगोलिक परिस्थिति नाहीं. चीनचा दर्जा चालू युद्धांत बराच वाढलेला दिसतो, परंतु त्याचीं कारणें वेगळीं आहेत. संयुक्त राष्ट्रांपैकीं इतर कोणत्याहि राष्ट्रापेक्षा चीननें युद्धाचे आघात जास्त काळ सहन केलेले आहेत, ह्या दृष्टीनें व श्वेतेतर वर्णाच्या राष्ट्रांपैकीं एकादें राष्ट्र संयुक्त राष्ट्रांच्या पंक्तीस असणें आवश्यक आहे ह्या कल्पनेनें चीनला महत्त्व देण्यांत येत आहे. चीनला रशिया, ग्रेटब्रिटन, अमेरिका, इत्यादींची बरोबरी करतां येणार नाहीं. चीनला मिळालेला दर्जा हा त्यानें आपल्या गुणावर मिळविलेला नसून, इतर संयुक्त राष्ट्रांनीं तो चीनला बहाल केलेला आहे. सहाजीकच, युद्धोत्तर व्यवस्थेंत चीनवर इतर संयुक्त राष्ट्रांच्या बरोबरीची जबाबदारी टाकण्यांत येणार नाहीं. फ्रान्ससारखें राष्ट्र सध्या जरी दुय्यम दर्जाचें झालें असलें, तरी युद्धानंतर त्याचा प्रमुख राष्ट्रांत पुनः समावेश होण्याचा रंग दिसतो. मोठाल्या जागतिक परिषद्‌तून दुय्यम राष्ट्रांना प्रतिनिधित्व मिळालें, तरी प्रमुख राष्ट्रांकडेच पुढारीपण रहातें व महत्त्वाच्या मसुद्यांवर व करारावर सही करण्याची संधी मिळाल्यानें केवळ राष्ट्रांचा दर्जा वाढत नाहीं. किती ताकद, नित्याचे व्यवहार चालू ठेवूनहि, बळयुद्धासाठी उपयोगांत आणतां येईल, ह्या गोष्टीवरच राष्ट्राचें अंतिम सामर्थ्य अवलंबून असतें. ह्या दृष्टीनें, हिंदुस्थानास आपला दर्जा वाढविण्यासाठीं पुष्कळच प्रगति घडवून आणली पाहिजे. दिलेला पोकळ मान व अंतिम सत्तेच्या बळावर मिळविलेला दर्जा ह्यांतील फरक फार महत्त्वाचा आहे.

## सभांचा कायदा व कार्यपद्धति *

सभा चालविण्याचें कांहीं ठराविक शास्त्र असतें व विशिष्ट नियमानुसारच सभा चालवाव्या लागतात, परंतु त्यासंबंधांतील नियमांची माहिती फारच थोड्यांस असते. सभेंत भाग घेणारास जसे कांहीं अधिकार असतात, त्याचप्रमाणें त्यावर कांहीं बंधनेंहि असतात. सभेचें स्वरूप, सभेचा प्रकार, तिचा प्रसंग, तिचा उद्देश, इत्यादींवर तिची कार्यपद्धति अवलंबून असते. शिष्टसंमत नियम कांहीं सभांस लागू पडतात, तर कांहीं सभांचे नियम कायद्यानें घालून दिलेले असतात. प्रस्तुत पुस्तक हें ह्या विषयांवरील पहिलेंच पुस्तक असून त्यांत "विवेचन विभाग" व "नियम विभाग" असे दोन भाग आहेत. पहिल्या भागांत सभाशास्त्राच्या विस्ताराचें तात्विक विवेचन करण्यांत आलें आहे व दुसऱ्या भागांत ग्रामपंचायती, नगरपालिका, जिल्हा लोकलबोर्डे, सहकारसभा, इत्यादींच्या नियमांचे नमुने दिले आहेत. सभेचें काम कायदेशीर व यशस्वी रीतीनें पार पडणें हें केवळ नियमांनीं साध्य होत नाहीं; सभेंत भाग घेणारांच्या सहकार्यावर व सद्हेतूवरच सभेचें खरें यश अवलंबून रहातें. तथापि, अनुभवांतीं व व्यावहारिक दृष्टीने विचार करूनच नियम बसविलेले असतात. ह्यासाठीं त्या नियमांची व त्यांच्या पार्श्वभूमीची प्रत्येकास माहिती असणें आवश्यक आहे. सहकारी संस्था, जॉइंट स्टॉक कंपन्या, स्थानिक स्वराज्य संस्था, विधिमंडळें, ह्या सर्वांच्या कामकाजाची माहिती त्यांत प्रत्यक्ष भाग घेण्यास प्रारंभ करण्यापूर्वींच प्रत्येकानें करून घेणें इष्ट असतें. प्रस्तुत पुस्तक सार्वजनिक व्यवसायांत पडणारांस उपयुक्त व मार्गदर्शक होईल. अत्यंत अवघड विषय सोपा करून सांगण्याचा पुस्तककर्त्यांचा प्रयत्न फलदायी होवो.

### ग्रेट ब्रिटनमधील बॉम्बहल्ल्यांचे बळी

ताजे आकडे

| | | जखमी | |
|---|---|---|---|
| १९४३— | मृत. | इस्पितळांत ठेवले | एकूण बळी |
| ऑक्टोबर | ११८ | २८३ | ४०१ |
| नोव्हेंबर | ११९ | २३८ | ३५७ |
| डिसेंबर | १० | ४१ | ५१ |
| १९४४— | | | |
| जानेवारी | १०७ | २७० | ३७७ |
| फेब्रुवारी | ९६१ | १,७१२ | २,६७३ |
| सप्टें. १९३९ ते फे. १९४४ अखेर | ५१,२८५ | ६१,९३४ | १,१३,२१९ |

फेब्रुवारीमधील बॉंबहल्ल्यांत सांपडलेल्या लोकांच्या संख्येइतकी मोठी संख्या मे, १९४१ नंतर कोणत्याच महिन्यांत भरली नव्हती.

### ऑक्सफर्ड विश्वविद्यालयांत रशियन

ऑक्सफर्ड विश्वविद्यालयानें रशियन भाषेसाठीं एक स्वतंत्र शाखा उघडण्याचें ठरविलें आहे.

*लेखक व प्रकाशकः श्री. शंकरराव जोशी, बी. ए., एलएल. बी. प्रकाशक न्यायदीप मंदिर, बेळगांव पृ. १०५ किं. २ रु. ८ आ.

## • नागपूर हायकोर्टाचा महत्त्वाचा नवीन निर्णय

**लहान गहाण—ऋणकोचा हक्क पुनः प्रस्थापित झाला.**

शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या कर्जांचा भार हलका व्हावा म्हणून लवाद कायदा व रिलीफ कोर्टांचा कायदा मध्यप्रांत सरकारनें अंमलांत आणला. गहाणी कर्जांच्या या कायद्यानें किस्ती व्हाव्या हा उद्देश होताच, तथापि नागपूर हायकोर्टांतील दाऊ बळवंतसिंग वि. बिंदाबाई ह्या दिवाणी रिव्हिजनमध्यें लहान गहाणावरून कच्ची डिक्री झाल्यावर ज्याला रिलीफ कायद्यांतील अर्थानें कर्ज म्हणतां येईल असें कर्ज जजमेंट डेटरवर शिल्लक रहातें काय, हा महत्त्वाचा प्रश्न होता.

लहान गहाणाचा व्यवहार ज्या दिवशीं झाला असेल त्याच दिवशीं गहाणी इस्टेटींतील ऋणकोचा हक्क तात्पुरता नष्ट होतो. त्या गहाणाची फेड करण्यासाठी जी मुदत ठरली असेल त्या मुदतींत ऋणकोनें जर कर्जाची फेड केली नाहीं तर त्याचा (ऋणकोचा) त्या (गहाणांतील) इस्टेटींतील हक्क कायमचा नष्ट होतो. ठरलेल्या मुदतींत ऋणकोनें गहाणाची फेड केली नाहीं व करार मोडला तरी कायदा असें म्हणतो कीं, त्याला गहाणी इस्टेट परत मिळविण्याची आणखी एक संधी देण्यांत यावी. कायद्यानें ऋणकोला दिलेल्या अशा प्रकारच्या सवलतीला 'कर्ज अथवा देणें' म्हणतां येत नाहीं. रिलीफ कायद्यांत 'कर्जा'ची जी व्याख्या देण्यांत आली आहे तिच्यांत गहाणी कर्जांचा समावेश करण्यांत आला आहे हें खरें आहे, परंतु गहाणावरून डिक्री होण्यापूर्वींची परिस्थिति व डिक्री झाल्यानंतरची परिस्थिती ह्या दोहोंत फरक असतो. लहान गहाणावरून कच्ची डिक्री झाल्यानंतर त्याच्यावर कोणत्याही प्रकारचें 'कर्ज' अथवा 'देणें' शिल्लक रहात नसल्यामुळें त्या कर्जाचे बाबतींत ऋणकोनें दिलेला अर्ज स्वीकारण्याचाच मुळीं रिलीफ कोर्टाला जेथें अधिकार नाहीं तेथें दिवाणी कोर्टांतील कारवाई थांबविण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. असें म्हणून हायकोर्टानें रिव्हिजन मंजूर केलें.

लहान गहाणाचे दाव्यांत जर कच्ची डिक्री झाली असेल तर त्या बाबतींत रिलीफ कोर्टास कांहींच करतां येत नाहीं. ऋणकोची इस्टेट अर्थातच फायनल डिक्री झाल्याबरोबर सावकारास मिळावी असा याचा अर्थ झाला. रिलीफ कोर्टानें अशा डिक्रीच्या किस्ती केल्या तरी वरील निर्णयाचे आधारावर दिवाणी कोर्टांनीं तिकडे दुर्लक्ष करून पक्की डिक्री (फायनल डिक्री) करून टाकली. अशा निकालावरून ज्यांनीं ज्यांनीं अपील केलें त्यांचेवरील संकट सुदैवानें टळण्याचा आतां योग प्राप्त झाला. हायकोर्टाचे फुलबेंचनें (तीन जज्ज) ता. १०-४-४४ रोजीं मागील दोन जज्जांनीं दिलेला निकाल चुकीचा आहे असा निर्णय दिला. या निर्णयामुळें असंख्य लोकांचें कल्याण होणार आहे, परंतु ज्या ज्या कर्जदारांनीं अपील न करतां फायनल डिक्री होऊं दिली, त्यांना मात्र या संधीचा फायदा मुळींच मिळणार नाहीं. त्यांना फायदा मिळावा याकरितां आतां वेगळा कायदाच करणें भाग पडेल.

### मालेगांव कँप को. स्टोअर लि.

वरील संस्थेस जिल्हा कलेक्टरांनीं ता. १८ मार्च रोजीं भेट दिली. १ एप्रिलपासून रेशनिंगचें दुकान चालविण्यास स्टोअरला मिळालें आहे.

# स्फुट विचार

## शास्त्रीय संशोधन आणि प्रो. हिल

ब्रिटिश कॉमन्स सभेचे समासद आणि इंग्लंडमधील रॉयल सोसायटीचे चिटनवीस प्रो. हिल, नुकतेच हिंदुस्थानांत प्रवास आणि शास्त्रीय संशोधनाच्या व्यवस्थेची चौकशी करून स्वदेशीं परत गेले आहेत. आधुनिक भौतिक शास्त्रांच्या शिक्षणाची ह्या देशांत किती सोय आहे आणि तिचा किती विस्तार केला पाहिजे ह्याची पहाणी त्यांनीं केली असून तिच्यावर आधारलेल्या आपल्या सूचना ते हिंदुस्थान सरकारास लवकरच सादर करणार आहेत. हिंदुस्थानांत असतांना त्यांनीं ह्या देशाच्या अर्थविषयक व शास्त्रीय प्रगतीसंबंधानें स्वतःचे विचार व्यक्त केलेच होते आणि शास्त्रीय संशोधन व प्रयोग ह्यांची विस्तृत तरतूद करण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली होती. हेच विचार त्यांनीं लंडनमध्यें रेडिओवर केलेल्या भाषणांत ब्रिटिश जनतेपुढें मांडले आहेत. हिंदुस्थान देश दरिद्री आहे ह्याविषयीं त्यांस शंका नाहीं. तथापि, येथील नैसर्गिक साधनसामुग्रीचा आधुनिक शास्त्रांच्या व यंत्रांच्या सहायानें उपयोग केला गेल्यास हें दारिद्र्य दूर करतां येण्यासारखें आहे असा त्यांस विश्वास वाटत आहे. हिंदुस्थानची वाढती लोकसंख्या, तिचें आरोग्य, अन्न व शेतीचा धंदा ह्यांचेसंबंधांतील प्रश्न सोडवण्यासाठी वहातुकीचीं विस्तृत साधनें, पाणीपुरवठा, सुधारलेलीं खतें, नवीन कारखानें, यंत्रें, विजेच्या प्रेरक शक्तीचा उपयोग, इत्यादि साधनांचें फार मोठें महत्व आहे असें प्रो. हिल म्हणतात. शास्त्रीय संशोधनाच्या व प्रयोगांच्या संस्था वाढवल्या पाहिजेत आणि त्यांत शास्त्रीय तज्ञ शिकवून तयार केले पाहिजेत असें ते म्हणतात. त्याचप्रमाणें आर्थिक संवर्धनाची योजना ह्या देशांत आखली जाऊन तिची शास्त्रीय पद्धतीनें अंमलबजावणी होण्याची आवश्यकताहि त्यांनीं प्रतिपादली आहे. हिंदुस्थानांतील लोकमतानें ह्या गोष्टींचा पुरस्कार आज कित्येक वर्षें चालवला आहे. प्रो. हिल ह्यांच्या सूचनांचा तरी योग्य तो परिणाम व्हावा अशीच येथें सर्वांची इच्छा आहे.

---

## आर्थिक संवर्धनाच्या योजनेचें रहस्य

बंगालमधील दुष्काळाच्या आपत्तीचा दाखला देऊन प्रो. हिल ह्यांनीं वर निर्दिष्ट केलेल्या आपल्या भाषणांत हिंदुस्थानांत जनतेच्या रहाणीचें मान कोणत्या खालच्या थरास जाऊन पोहोंचलें आहे आणि त्याच्या संरक्षणाचीं साधनें किती कमकुवत आहेत ह्याचें चित्र रेखाटलें. दूर दृष्टीनें बनवलेली आर्थिक संवर्धनाची योजना, ती यशस्वी होण्यासाठी शास्त्रीय उपायांचा उपयोग, दीर्घ, प्रामाणिक परिश्रम व सार्वत्रिक सहकार्य ह्यांचा आश्रय घेतला गेला नाहीं तर ह्या देशाचा तरणोपाय नाहीं आणि बंगाली दुष्काळासारख्या आपत्तींची पुनरावृत्ति होण्याची निश्चित भीति आहे असें त्यांनीं म्हटलें आहे. बंगालमधला दुष्काळ हा राजकीय मतभेद व भांडणें ह्यांचे योगानें ओढवला अशा मताचा सूर त्यांच्या भाषणांतून निघतो. आर्थिक उन्नतीच्या प्रयत्नांस मनोभावें करून स्वतःस वाहून घेण्याऐवजीं लोक राजकीय चळवळीकडे अधिक लक्ष पुरवतात असें प्रो. हिल ह्यांस आढळून आलें असावें असें दिसतें आणि ही परिस्थिति ह्या देशाच्या दारिद्र्यनिवारणाच्या मार्गांतली मोठी धोंड आहे असें त्यांचें मत झालें असावें असें वाटतें. आर्थिक प्रगतीचा प्रश्न वादविवादातीत असला पाहिजे ह्यांत संशय नाहीं आणि राजकीय स्वरूपाच्या मतभेदांचा अडथळा तो सोडवण्याच्या आड येतां कामा नये ही गोष्ट सर्व राजकीय पक्षांच्या मनावर बिंबली गेली पाहिजे. तथापि शास्त्रीय सुधारणा व यांत्रिक प्रगति ह्यांचा उपयोग देशाच्या आर्थिक उन्नतीस होण्यास जनतेच्या प्रतिनिधींच्या हातांत राजकीय सत्ता असणें अगत्याचें आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. आर्थिक संवर्धनाचें कार्य हिंदी लोकांनीं हातीं घ्यावें आणि त्यास ब्रिटिश राष्ट्रानें सहाय करावें अशी इच्छा प्रो. हिल ह्यांनीं व्यक्त केली आहे. प्रमुख हिंदी धंदेवाल्यांनीं अभिवृद्धीची योजना प्रसिद्ध केलीच आहे. राष्ट्रीय मध्यवर्ती सरकारनें ती हातीं घ्यावी असें त्यांनीं सुचवलें आहे त्याचें रहस्य स्पष्ट आहे.

---

## साम्राज्य मुख्य प्रधानांची परिषद

ब्रिटिश साम्राज्यांतील राष्ट्रांच्या मुख्य प्रधानांची परिषद लंडनमध्यें चालू झाली आहे. जर्मनी व जपान ह्यांच्या आक्रमक शक्तींचा नाश करून जगांत स्वातंत्र्य, समता व शांतता ह्यांची स्थापना व्हावी हें उद्दिष्ट स्वतःपुढें ठेवून मित्रराष्ट्रें स्वार्थत्यागपूर्वक लढा आज लढत आहेत. ह्या घोर संग्रामांत अमेरिका आणि रशिया ह्यांच्या बरोबरीनें व त्यांच्या इतक्याच श्रद्धेनें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत राष्ट्रें युद्धाचा पिच्छा पुरवीत आहेत. युरोपांत व एशिया खंडांत चाललेल्या मोहिमांत त्यांच्या लढाऊ धोरणाचे व परस्पर सहायाचे अनेक अवघड प्रश्न उपस्थित झाले आहेत आणि होणार आहेत. त्यांची चर्चा करून एकसूत्री कार्यक्रम बनवणें आणि त्याची परिणामकारक अंमलबजावणी होण्याची व्यवस्था करणें हा साम्राज्य परिषदेचा पहिला हेतु आहे. युद्धोत्तर पुनर्घटनेचा आराखडा तयार करणें आणि त्या संबंधांत सर्वसंमत अशी योजना आखणें हा तिचा दुसरा उद्देश आहे. युद्ध समाप्तीनंतर जगांतील राष्ट्रांचे परस्पर संबंध कसे रहातील आणि त्यांमध्यें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत राष्ट्रांचें स्थान कसें राहील ह्याविषयीं बरीच चर्चा झाली आहे. कांहीं झालें तरी ब्रिटिश साम्राज्याची घडण कायम राहील आणि त्यांतील देशांचे परस्पर संबंध आपुलकीचे व सहकार्याचे रहातील असा विश्वास मि. चर्चिल ह्यांनीं अनेक वेळां स्पष्टपणानें व्यक्त केला आहे. साम्राज्य परिषदेंत हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनीं भाषणें केलीं आहेत आणि आवश्यक दिसेल त्या प्रसंगीं चर्चेंत भाग घेण्याची मुभा त्यांस मिळणार आहे. तथापि, कॅनडा, दक्षिण आफ्रिका व ऑस्ट्रेलिया ह्यांच्या मुख्य प्रधानांच्या बरोबरीचें स्थान परिषदेंत त्यांस नाहीं हें उघड आहे. शत्रुपराभवासाठी हिंदुस्थान पराकाष्ठा करीत आहे व करील असें आश्वासन त्यांनीं दिलें असून युद्धोत्तर काळांत ह्या देशास साम्राज्यांत मानाची स्वतंत्र जागा मिळेल अशी आशा व्यक्त केली आहे.

---

## सरकारी रोख्यांसंबंधीच्या कायद्यांत सुधारणा

सरकारी रोखे इतके दिवस मुख्यतः प्रॉमिसरी नोटांचे स्वरूपांतच असत. स्टॉक सर्टिफिकिटें (ज्यांत मालकी हक्क नमूद केलेले असतात परंतु मालकीची बदली पब्लिक डेट ऑफिसमध्यें नोंदावी लागते) हीं आतांच विशेष प्रचारांत आलीं आहेत.

निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस बाबत कायदा वेळोवेळ सुधारण्यांत आला, त्या प्रसंगीं सरकारी प्रॉमिसरी नोटांबाबत अडचणी दूर करण्दाचाच फक्त विचार झाला; इतर सरकारी रोख्यांकडे लक्ष घेतें नाहीं. १९२० च्या इंडियन सिक्युरिटीज ॲक्टमध्यें सरकारी प्रॉमिसरी नोटा व इतर सरकारी रोखे ह्यांतील फरकाचा नीट विचार झाला नाहीं. उदाहरणार्थ, १३ व्या कलमांत बांधे मिटविण्याची व्यवस्था सांगितली आहे, ती फक्त सरकारी प्रॉमिसरी नोटांपुरतीच आहे. अशाच प्रकारचे कित्येक दोष त्या कायद्यांत राहून गेलेले आहेत. ह्या कायद्याची जागा घेणारें एक बिल मध्यवर्ती असेंब्लींत सरकारनें मांडलेलें आहे परंतु हें बिल फक्त मध्यवर्ती सरकारच्या रोख्यांसच लागू पडणारें आहे; १९२० चा कायदा प्रांतिक सरकारच्या रोख्यांसहि लागू होता. ह्या बिलाचें कायद्यांत रूपांतर झालें, म्हणजे प्रांतिक सरकारांच्या रोख्यांस १९२० चा कायदा लागू व मध्यवर्ती सरकारच्या रोख्यांस नवा कायदा लागू, असा प्रकार होणार आहे. सर्व प्रांतिक सरकारांनीं नव्या बिलाप्रमाणेंच स्वतः बिलें पास केलीं, तर ही अवस्था येणार नाहीं.

---

## श्री. प्राणलाल ह्यांच्या सूचना

इंडियन मर्चंटस चेंबरच्या कमिटीची एक औपचारिक सभा नुकतीच भरली होती, तिला रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामणराव देशमुख हे उपस्थित होते. त्या प्रसंगीं चेंबरचे अध्यक्ष, श्री. प्राणलाल देवकरण नानजी, ह्यांनीं सरकारी रोख्यासंबंधींच्या नियोजित कायद्याचा उल्लेख केला. रोख्यावरील व्याज व रोख्याचें मुद्दल देणें असेल, त्या तारखेपासून सहा वर्षांत त्याची मागणी केली नाहीं, तर तें देण्याची जबाबदारी सरकारवर नाहीं, असें एक कलम नियोजित कायद्यांत आहे, तिला प्राणलाल ह्यांनीं विरोध केला. जुनी प्रॉमिसरी नोट रिन्यू करून घेतली म्हणजे नवी नोट धारण करणारास जुन्या नोटेवरील शेऱ्यांबद्दल चौकशी करण्याचें कारण नाहीं; सरकारनें प्रॉ. नोट रिन्यू करून दिल्यानें जुन्या प्रॉ. नोटेंतील शेऱ्यांमधील दोष नाहींसे होतात, अशी कित्येक वर्षांची जुनी समजूत आहे, ती प्रिव्ही कौन्सिलच्या एका निकालानें निकालांत काढली. जुन्या सरकारी प्रॉ. नोटेवरील शेऱ्यांमधील कांहीं चुकीमुळें प्रॉ. नोट रिन्यू करून देण्यांत सरकारास कांहीं नुकसान आलें तर जुन्या प्रॉ. नोटेवरील शेवटच्या सहीदाराकडून तें भरून घेण्याचा अधिकार सरकारास आहे, असा त्या निवाड्याचा अर्थ आहे ह्या निवाड्यामुळें थोडी अनिश्चितता निर्माण झाली आहे ती दूर करावी; निदान रिन्यू केलेल्या प्रॉ. नोटांचे बाबत पूर्ण कायदेशीर जबाबदारी सरकार घेण्यास तयार नसेल, तर सरकारनें कांहीं काळाची मुदत ठरवून, त्या मुदतीनंतर कोणत्याहि शेऱ्याच्या संबंधांत तक्रार चालणार नाहीं, असें जाहीर करावें, अशी श्री. प्राणलाल ह्यांची सूचना आहे. सरकारी रोख्यांमध्यें ट्रस्टी, गार्डियन, धर्मादाय संस्था, सार्वजनिक संस्था, इत्यादींस मोठ्या प्रमाणावर पैसे गुंतवावे लागतात, त्यांचा वरील सूचनांस निश्चित पाठिंबा मिळेल.

---

## शेअर बाजार

( श्री. ब. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम )

मागील आठवड्यांत भावांत कांहींच फेरफार नसून बाजार सुस्त आहे. कोहीमा संकटांत असल्यानें टाटा डिफर्ड २१४५ वरून २०९० पर्यंत व ऑर्डिनरी ४१४ वरून ४०४ पर्यंत नरमले आहेत. इकडे महात्मा गांधींची सुटका झाल्यानें जरी बाजारानें निश्वास टाकला असला तरी त्यांच्या प्रकृतीची छाया राहणार असल्यानें बाजारांत कामकाज विशेष होईल असें वाटत नाहीं.

साडेतीन टक्का कागद ९८।३ पर्यंत पुन्हा खालीं आला असून कायम गुंतविणारास पुन्हा घेण्यास एक संधि आली आहे व जर तो आणखी खाली गेला तर पैसेवाल्यांनीं बेधडक खरेदी करावी. सरकारनें कमीत कमी किंमत ९४ ठरविली असल्यानें त्यांत धोक्याची मर्यादा किती आहे हें अज्ञ माणसास सुद्धां समजेल.

नेहमीच नागपूर कोहिनूर घेऊन कंटाळलेल्या मंडळींना ब्रिटिश सिलोन कॉर्पोरेशन आकर्षक वाटेल यांत संशय नाहीं. ही कंपनी सिलोनमध्यें असून तिचे खोबऱ्याच्या तेलाचे, साबणाचे व काथ्याचे कारखाने आणि खुद्द खोबऱ्याचा फार मोठा व्यापार आहे व सर्व माल ब्रिटिश सरकारकडून मागीलप्रमाणें ठराविक किंमतीस घेतला जात आहे. दोन वर्षें कंपनीनें ३२ टक्के करमाफ व्याज दिलें आहे. मूळ शेअर रु. ७॥ चा असून आज बाजारभाव १९, १९॥ पर्यंत आठ टक्के सव्याज आहे. कंपनीचें भांडवल ३० लाखांवर असून गंगाजळी ९ लाखांवर आहे. चालू भावांत घेणाराला १०-११ टक्के व्याज सुटेल.

ज्यांना आपले पैसे बिनव्याजीं ठेवण्याची ऐपत असेल त्यांना युनायटेड कमर्शियल बँकेचे शेअर्स विशेष सांगण्यासारखे आहेत. ही बँक मागच्या वर्षी बिर्ला शेटजी, डहाणूकर, टापुरिया, गोएन्का, इस्पहानी इत्यादी श्रेष्ठींनीं काढलेली असून सुरवातीसच तिचे एक कोट भरपाई भांडवल जमलें. तिचा नुकताच प्रथम अहवाल आला असून नफा चार लाख व ठेवी बारा कोटी आहेत असें दिसून येतें. प्रथम वर्षांत ही आश्चर्यकारक प्रगति आहे. मात्र व्याज वाटण्यांत आलेले नसून प्राथमिक खर्च ताळेबंदांतून पुसून टाकण्याकडे नफ्याचा विनियोग होणार आहे. ही बँक पुढील दहावीस वर्षांत अत्यंत प्रबळ झाल्याखेरीज राहणार नाहीं असें वाटतें. आज ५० रु. भरलेल्या शेअरची किंमत ७८-७९ आहे.

---

### बंगालमध्यें शेतीच्या उत्पन्नावर कर

वार्षिक ३५०० रुपयांवरील शेतीच्या उत्पन्नावर कर बसविणारें बिल बंगाल असेंब्लीनें मंजूर केलें आहे.

### दक्षिण आफ्रिकेंत वर्णभेद

साधारणतः युरोपियनांच्या डब्यांत प्रवास करण्यास व जेवणाच्या डब्यांत जेवण्यास हिंदी लोकांना परवानगी नाहीं, असें द. आफ्रिकेच्या असेंब्लींत दहातुकमंड्यांनीं सांगितलें. कांहीं हिंदी लष्करी अधिकाऱ्यांचे संबंधांत नुकताच अपवाद केला होता

## पोस्ट व तार खात्याचें वाढतें काम

हिंदी पोस्ट व तार खात्याचा १९४२-४३ चा ताजा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून खात्याच्या कामांत झालेली प्रचंड वाढ लक्षांत येते. मनिऑर्डरींची संख्या ३० लाखांनीं वाढून ती ५ कोटि, १० लक्ष झाली. तारांची संख्या १५ लाखांनीं वाढली, ती २ कोटि, ४० लक्ष भरली. ट्रंक टेलिफोन कॉल्सची संख्या ३ कोटि, २० लाखांची ३ कोटि, ७० लक्षावर गेली. मुंबई, कलकत्ता, मद्रास, कराची व अहमदाबाद येथील टेलिफोन कंपन्या आतां सरकारनें विकत घेतल्या असल्याकारणानें हिंदुस्थानांतील सर्व टेलिफोन सरकारी व्यवस्थेखालीं आहेत. प्रयोगाखातर चालू केलेल्या पोस्ट ऑफिसांपैकीं १९१ ( शहरांत २७ व खेडेगांवांत १६४ ) कायम करण्यांत आलीं, ४९ ( शहरांत १२ व खेडेगांवांत ३७ ) बंद केलीं गेलीं व ६६५ ( शहरांत १३४ व खेड्यांत ५३१ ) पोस्ट ऑफिसांचा प्रयोग चालू ठेवण्यांत आला.

### खात्याचें दंगलींत नुकसान

१९४२ मधील दंगलींत ६० पोस्ट व तार ऑफिसें पूर्णपणें नाश पावलीं व २७० कचेऱ्यांचें मनस्वी नुकसान झालें. १२ हजार वेळां तारा तोडण्यांत आल्या. ह्या सर्व प्रकारांमुळें खात्याचें ३½ लक्ष रुपयांचें नुकसान झालें.

### बिनपत्त्याचीं पत्रें

डेडलेटर ऑफिसांत ८५ लक्ष पत्रांची चौकशी करण्यांत आली. लोक पोस्टांत पत्रें टाकतात, त्यांपैकीं प्रत्येक १०,००० पत्रांतील ५ पत्रांवर पत्ता लिहिलेला नसतो. दररोज सरासरीनें बिनपत्त्याचीं २२४ पत्रें ठिकठिकाणच्या पोस्टाच्या पेट्यांत सांपडतात.

---

## फेडरल कोर्टाच्या कामकाजावर सर जॉन बोमंट ह्यांचा अभिप्राय

संयुक्त राज्यघटनेंत मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारें व देशी संस्थानें ह्यांचेमधील संबंध फेडरल घटनेंत समाविष्ट केलेले असतात व त्याविषयीं बाधा उपस्थित झाल्यास निर्णय देण्यासाठी म्हणजे घटनेचें रक्षण करण्यासाठीं फेडरल कोर्टाची आवश्यकता असते. १९३५ च्या हिंदी घटना कायद्यानें अशा प्रकारच्या फेडरल कोर्टाच्या स्थापनेची तरतूद केली व त्याप्रमाणें तें १९३७ मध्यें अस्तित्वांत आलें व त्यास अखिल भारतीय अपील कोर्टाचाहि दर्जा देण्यांत आला. तथापि, हिंदी फेडरल राज्यघटना तयार झाली, तरी फेडरेशन अस्तित्वांत आलें नाहीं. फेडरल कोर्ट मात्र स्थापन होऊन त्याच्या कामास प्रारंभ झाला. मुंबई हायकोर्टाचे माजी सर न्यायाधीश सर जॉन बोमंट ह्यांनीं आपल्या लंडनमधील भाषणांत ह्या प्रश्नाचा उल्लेख केला. फेडरल कोर्टावर दरसाल होणारा सुमारें ४ लक्ष रुपयांचा खर्च ही केवळ एक चैनीची बाब आहे, असें ते म्हणाले. १९३७ सालापासूनचें त्या कोर्टाचें काम पाहिलें, तर त्याच्या न्यायाधीशांना वर्षांतून सरासरीनें तीन-चार आठवडे सुद्धां काम पडत नाहीं. फेडरल कोर्टाकडे येणारीं अपिलें प्रिव्हि कौन्सिलकडे येतेंच युक्त होईल, असेंहि त्यांनीं सांगितलें. अपिलासाठीं स्वतंत्र अखिल भारतीय अपील कोर्ट पुढेंमागें स्थापन करण्यांत येईलच, असें ते म्हणाले व सध्याच्या फेडरल कोर्टाच्या न्यायाधीशांची फुरसत कमी करण्यासाठीं त्या कोर्टाकडील काम वाढविण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

प्रगतिपथावरील नवा
मैलाचा — दगड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ
ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे — सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी — मॅनेजिंग डायरेक्टर

रक्तवर्धक प्रमाणेंच लोकप्रिय
दोन उपयुक्त औषधें.
ओजस — पौष्टिक पेयान्न
आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस उपयुक्त
मुलांचे करितां — ॲंटी ग्राइप मिक्श्चर
दांत सुलभतेनें येण्यावर व मुलांचे अपचनाचे विकारावर
केंद्रें:—मुंबई, पुणें, नागपूर, अमरावती, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
पुणें मुख्य दुकान:—गणपती चौक, लक्ष्मीरोड पुणें.
आयुर्वेद रसशाळा
पुणें लि० पुणें ४.

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

## महिंद्रकर ब्रदर्स

गिरगांव मुंबई नं. ४

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी

चिनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्कॉश, टोमॅटो सॉस मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखाः— माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिसः— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.